Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# निवडणूक विषयक घटनात्मक तरतुदी आणि निवडणूक यंत्रणा

**होनवडजकर शैलेश प्रकाशराव**
संशोधक

**प्रा. डॉ. आर. डी. शिंदे**
संशोधन मार्गदर्शक व राज्यशास्त्र विभागप्रमुख
कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर
ता. बिलोली जि. नांदेड

**प्रस्तावना**

भारत एक समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले राष्ट्र आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आधुनिक भारतीय राष्ट्र अस्तित्वात आले. भारतीय राज्यघटना, निवडणूक कायदे ह्यांचा विचार करता मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी भारताचा निवडणूक आयोग हा भारतातील संघ आणि राज्य निवडणूक प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्यासाठी जबाबदार आणि स्वायत्त घटनात्मक प्राधिकरण आहे. भारतीय राज्यघटनेने सरकारचे संसदीय स्वरूप स्वीकारले आहे. भारताच्या संसदीय प्रणालीत भारताचे राष्ट्रपती आणि दोन सभागृहे ते म्हणजे राज्यसभा आणि लोकसभा यांचा समावेश होतो. भारत राज्यांचे संघराज्य असल्याने प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र राज्य विधानमंडळे आहेत. देशात आंध्र प्रदेश, तेलंगणा, बिहार, जम्मू आणि काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांमध्ये विधिमंडळाची दोन सभागृह आहेत. एकंदरीतच भारतातील लोकसभा, राज्यसभा, राज्य विधानसभेच्या निवडणुका आणि देशातील राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींच्या निवडणूक प्रक्रियेचे देखरेख, दिशा आणि नियंत्रण भारतीय निवडणूक आयोगाला करावे लागते. भारतीय राज्य घटनेच्या पंधराव्या भागात कलम ३२४ मध्ये भारतीय निवडणूक आयोगाच्या संदर्भात सविस्तर वर्णन करण्यात आलेले आहे. भारतीय निवडणूक आयोग ही घटनात्मक व स्वायत्त संस्था असून निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी राज्यघटनेच्या कलम ३२४ नुसार करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध लेखासाठी सामाजिक शास्त्रातील ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. निवडणूक विषयक भारतीय संविधानातील तरतुदींचा आढावा घेणे.
२. भारतीय निवडणूक आयोगाची यंत्रणाचा अभ्यास करणे.

**भारतीय संविधानातील निवडणूक विषय तरतुदी**

राज्यघटनेतील पंधराव्या भागात कलम ३२४ ते ३२९ मध्ये देशातील निवडणूक प्रक्रियेसंबंधी महत्त्वाच्या तरतुदी दिलेल्या आहेत. कलम ३२४ मध्ये स्वतंत्र निवडणूक आयोगाची तरतूद केली आहे. भारतातील संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ही निवडणूक आयोगाच्या हाती सोपविलेली आहे. संसदेच्या व प्रत्येक राज्याच्या विधानमंडळाच्या सर्व निवडणुकाकरिता सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगावर

सोपविण्यात आलेली आहे. कलम ३२५ मध्ये केवळ धर्म, वंश, जात, लिंग यांपकी कोणत्याही आधारे कोणत्याही व्यक्तीस तिचे नाव मतदारयादीमध्ये समाविष्ट करण्यापासून अपात्र ठरविता येणार नाही. तसेच याच कलमात असेही नमूद केले आहे की, संसद आणि राज्य विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी प्रत्येक भौगोलिक मतदारसंघासाठी केवळ एकाच सर्वसाधारण मतदारयादीची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणुकीतील मतदानाबाबत नागरिकांना समान मानण्यात आले आहे. कलम ३२६ नुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका प्रौढ मतदानाच्या आधारावर घेतल्या जातील. भारतातील प्रत्येक नागरिकाला आणि १८ वर्षे वयापेक्षा अधिक असणाऱ्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे, तथापि योग्य कायदेमंडळाद्वारे (संसद किंवा राज्य विधिमंडळ) अनिवास, अस्थिर मानसिकता, गुन्हा व भ्रष्ट गैरव्यवहार इ. आधारावर एखाद्या व्यक्तीला कोणत्याही कायद्याने किंवा राज्यघटनेतील तरतुदीमुळे अपात्र ठरविले जाऊ शकते. कलम ३२७ मध्ये संसदेस विधानमंडळाच्या निवडणुका बाबत तरतूद करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

कलम ३२८ मध्ये राज्य विधान मंडळास विधान मंडळाच्या निवडणुकीबाबत तरतूद करण्याचा अधिकार. या कलमाच्या आधारे संसदेने विधानमंडळाच्या निवडणुकी संबंधित ज्या काही तरतुदी केलेल्या नसतील त्या तरतुदीच्या संदर्भात राज्य विधानमंडळास विधानमंडळाच्या निवडणुकीबाबत तरतुदी करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. कलम ३२९ मध्ये निवडणूक विषयक बाबी मध्ये न्यायालयांना हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने मतदारसंघाच्या क्षेत्रांचे परिसीमन किंवा मतदार संघातील जागांचे वाटप यासंदर्भात कलम ३२७ ३२८ नुसार केलेल्या कोणत्याही कायद्याची विधी ग्राह्यता कोणत्याही न्यायालयातून तपासली जाणार नाही.

**निवडणूक आयोगाची रचना**

जगात लोकशाही असलेला सर्वात मोठा देश अशी भारताची ओळख आहे. घटनेने आखून दिलेले कायदे आणि नियमांच्या चौकटीत ठराविक कालावधीनंतर भारतामध्ये मुक्त वातावरणात निवडणुका पार पडतात. एक अब्जाहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या या देशात १९५१ पासून २००४ पर्यंत लोकसभेच्या चौदा निवडणुका पार पाडल्या. लोकसभेच्या आगामी निवडणुका आता अगदी तोंडावर आल्या असतानाच निवडणुका घेण्याची जबाबदारी असलेल्या निवडणूक आयोगातील आयुक्तांमध्ये वाद निर्माण झाले आहेत. त्या वादाच्या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाची रचना, त्यांची कार्यपद्धती आणि अधिकाराचा हर्षल मळेकर यांनी घेतलेला वेध. कश्यप यांनी या संदर्भात केलेले विवेचन मौलिक आहे. त्यांच्या मते, 'निवडणुका मुक्त वातावरणात पद्धतशीरपणे होणे आणि त्या तशा होतात असे दिसणे नितांत आवश्यक आहे.' त्यामुळे यासाठी निवडणूक आयोगाची रचना व कार्यपद्धती ठरविण्यात आली आहे.

देशातील लोकशाही व्यवस्था निरोगी आणि भक्कम ठेवण्यामध्ये निवडणूक आयोगाचे कार्य हे अत्यंत पोषक ठरले आहे. निकोप वातावरणात निवडणुका पार पडाव्यात म्हणून निवडणूक आयोग या स्वतंत्र प्राधिकारणाच्या निर्देशनाखाली आणि त्याच्या अधीक्षणाखाली घ्यावयाच्या असतात. भारतामध्ये हे निवडणुका आखण्याचे व त्या काटेकोरपणे कार्यान्वीत करण्याचे सुसूत्र आणि सुनियोजित कार्य हे निवडणूक आयोगाने बजावले आहे. जे. सी. बात्रा यांच्या मते, The election commission possesses several vast inherant

powers legislative, admissible and interetative powers in the field of election. निवडणूक आयोगाला कायदेशीर, प्रशासकीय व निश्लेषणात्मक स्वरूपाचे विशाल अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. या अधिकाराचा वापर करून आयोग कार्य करते आणि अधिकार वापरून टी. एन. शेषन यांनी नवा आदर्श निर्माण केला. सर्वोच्च न्यायालयाने ३२४ कलमाच्या संदर्भात निवडणूक आयोगाच्या क्षमतांसाठी जणू हे कलम अधिकाराचा संग्रह म्हटले आहे. सुभाष कश्यप यांनी आयोगाचे काम भारतामध्ये कसे महत्त्वाचे ठरते त्यावर प्रकाश टाकताना म्हटले आहे, 'भारतासारख्या ३.३ दशलक्ष चौ. कि. मी. एवढ्या विशाल विस्ताराच्या आणि ११० कोटी एवढी प्रचंड लोकसंख्या असलेल्या आणि विस्तारलेल्या व्यापक मतदारसंघामध्ये निवडणुका घेणे म्हणजे खरोखरच एक अवाढव्य काम आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या बहुसांस्कृतिक देशात हे निवडणुकांचे वेळापत्रक काटेकोरपणे कृतीत आणणे सोपे नाही.

निवडणूक आयोगाकडे निवडणुकांचे नियोजन व कार्यान्वयन करण्याची जबाबदारी आहे. त्याची व्याप्ती कशी वाढत आहे ते सांगताना सुभाष कश्यप लिहितात, संसदेतील दोन्ही सभागृहांकरिता आणि राज्य विधिमंडळाकरिता घ्यावयाच्या निवडणुकांप्रमाणे निवडणूक आयोगाला राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती या पदासाठीही निवडणुका घ्याव्या लागतात.[८] यावरून आयोगाचे कार्यक्षेत्र व त्याची जबाबदारी किती विशाल आहे याची प्रचिती येते. भारतीय निवडणूक आयोग ही एक कायमस्वरुपी घटनात्मक संस्था आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली देशात लोकसभेच्या, विधानसभेच्या सर्व निवडणुकांची प्रक्रिया पार पाडण्यात येते. २५ जानेवारी १९५० रोजी स्थापन झालेल्या निवडणूक आयोगाने सुवर्णमहोत्सवी २००१ वर्ष साजरे केले होते. निवडणुकीसाठी देशभरात ५४३ मतदारसंघ असून त्यातून प्रत्येकी एक खासदार निवडून येतो. राज्यांच्या सीमा, लोकसंख्या, आयोगाचे कार्यक्षेत्र, भौगोलिक प्रदेश यावरुन मतदारसंघाचा आकार ठरविला जातो.

देशातल्या राज्यांमधील सरकार चालवण्यासाठी विधानसभेच्या निवडणूका होऊन सरकार स्थापन होते. सात केंद्रसासित प्रदेशांपैकी देशाची राजधानी दिल्ली आणि पाँडेचरी येथे विधानसभा आहे, तर सर्वात लहान समजल्या जाणाऱ्या पाँडेचेरीच्या विधानसभेत अवघे ३० सदस्य आहेत. निवडणुकांमध्ये मतदान करु शकणाऱ्यांची मतदारयादी प्रत्येक मतदारसंघात तयार होते. यात नाव असलेले लोकच मतदान करु शकतात. दरवर्षी मतदारयादीत सुधारणा करण्यात येतात. १९९८ मध्ये मतदारयाद्यांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय आयोगाने घेतला. ६२ कोटीं मतदारांचे नाव संगणकीकृत मतदारतयाद्यांमध्ये समाविष्ट झाले असून, हे काम जवळपास पूर्ण झाले आहे. लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. पाच वर्षांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी लोकसभा विसर्जित करुन निवडणुका घेण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. सरकारचा पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झाल्यावर विसर्जित होणाऱ्या लोकसभेचे शेवटचे अधिवेशन आणि नव्या लोकसभेचे पहिले अधिवेशन यात सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असता कामा नये, असे घटनेत म्हटले आहे. त्यामुळे त्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असते. निवडणूक आयोगाच्या कामकाजाविषयी जाणून घेताना आयुक्त टी. एन. शेषन. यांचा उल्लेख अपरिहार्यच आहे. १९९१ ते १९९६ या काळात आयुक्त असलेल्या शेषन यांची कारकीर्द खूप गाजली. त्यांची कठोर कार्यपद्धती, निवडणुकीला शिस्त लावण्याचा प्रयत्न, निवडणुकांतील भ्रष्टाचाराला चाप लावण्यासाठी शेषण यांना वचकून असत.

**मुख्य निवडणूक आयुक्त अधिकार**

भारतीय लोकशाहीच्या जडणघडणीत प्रभावी व कायम स्वरूपी निवडणूक यंत्रणा हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. देशामधील निवडणुका या मुक्त व खुल्या वातावरणात पार पडाव्यात म्हणून संविधानाने प्रस्थापित केलेल्या या संस्थेस विशेष महत्त्व आहे.[१] निवडणूक आयोग ही एक कायमस्वरूपी व स्वतंत्र संस्था होय. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अन्वये आयोगाला देशातील निवडणुकांचे अधिक्षण, दिशानिर्देशन व नियंत्रण करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले आहेत. संसद राज्य विधिमंडळे तसेच राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांची जबाबदारी आयोगाकडे सोपविण्यात आली आहे. त्याचे सूत्रपण मुख्य निवडणूक आयुक्ताकडे आहे. अशा प्रकारे निवडणूक आयोग ही एक अखिल भारतीय यंत्रणा असून ती केंद्र व राज्य सरकारसाठीही संयुक्तपणे कार्य करते. निवडणुक आयुक्त त्याचा प्रमुख अधिकारी असतो. निवडणूक आयोगाला घटनेच्या कलम ३२४ अन्वये आणि संसदेने वेळोवेळी संमत केलेल्या कायदे नियामनुसार खालील प्रमुख अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

१. १९५० च्या भारतीय लोकप्रतिनिधी कायद्यानुसार मतदारांची पात्रता, मतदार याद्यांची तपासणी व निर्मिती, मतदारसंघाची पुनर्रचना, संसद व राज्य विधिमंडळातील जागांची वाटणी ही सर्व कार्ये निवडणूक आयोगाला पार पाडावी लागतात.
२. लोकप्रतिनिधी कायदा १९५१ अनुसार निवडणुका घेण्यासाठी प्रशाकसीय यंत्रणेचे कार्यान्वयन, निवडणूक काळातील वाद, पोटनिवडणुका, राजकीय पक्षांचे नियमन ही सर्व कार्ये निवडणूक आयोगाला करावी लागतात.
३. डिलिमिटेशन ऑफ कमिशन ॲक्ट १९५२ अनुसार जागांची पुनर्व्यवस्था प्रादेशिक पातळीवर मतदारसंघची फेर आखणी, आरक्षण व इतर बाबींची पूर्तता करणे.
४. राष्ट्रपती व उपराष्ट्रपतींच्या निवडणुकीचा कायदा १९५२.
५. केंद्रशासित प्रदेश सरकार कायदा १९६२
६. केंद्रशासित प्रदेश दिल्ली कायदा १९५१

ग्रामपंचायत आणि महानगरपालिका निवडणुकीशी निवडणूक आयोगाचा संबंध नाही. कारण घटनेच्या कलम २४३ के व २४३ झेडए नुसार राज्य निवडणूक आयोगाची रचना करण्यात आली आहे.

**निवडणूक आयोगाची संरचना**

कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगाच्या रचनेबाबत खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१. निवडणूक आयोग हा प्रमुख निवडणूक आयुक्त आणि राष्ट्रपती वेळोवेळी नेमलेल्या सदस्यांनी युक्त असेल.
२. मुख्य निवडणूक आयुक्त व इतर आयुक्तांची नियुक्ती राष्ट्रपती करतील.
३. जेव्हा अन्य एखादा सदस्य नेमला जातो तेव्हा मुख्य निवडणूक आयुक्त अध्यक्ष या नात्याने कार्य करतील
४. राष्ट्रपती निवडणूक आयोगाशी चर्चा करून इतर प्रादेशिक आयोगाच्या आयुक्ताची नियुक्ती करतील ते आयोगास साह्य करतील.
५. निवडणूक आयुक्ताच्या सेवा शर्ती व कामकाज कालावधी या बाबी राष्ट्रपती ठरवतील.

त्याच्या स्थापनेपासून १५ ऑक्टोबर १९८९ पर्यंत निवडणूक आयोग एक सदस्यीय संस्था म्हणून कार्यरत होती. १९८९ साली ६१ व्या घटना दुरुस्तीनुसार मतदार वय २१ वरून १८ वर्षांपर्यंत आणण्यात आले तेव्हा निवडणूक आयोगाचे काम वाढल्यामुळे राष्ट्रपतींनी आणखी दोन सदस्यांची नियुक्ती केली. त्यामुळे निवडणूक आयोग त्रिसदस्यीय मंडळ बनले. परंतु जानेवारी १९९० मध्ये पुनश्च आयोगास पूर्ववत एक सदस्यीय रूप देण्यात आले. ऑक्टोबर १९९३ मध्ये राष्ट्रपतींनी आणखी दोन सदस्यांची नियुक्ती केली. तेव्हापासून निवडणूक आयोगाची सदस्य संख्या तीन बनली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त व इतर सदस्यांना समान अधिकार असून समान वेतन, भत्ते व अन्य सवलती दिल्या जातात. मुख्य आयुक्त व इतर सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाल्यास बहुमताने निर्णय घेतला जातो. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाला जे वेतन व भत्ते दिले जातात ते निवडणूक आयुक्तास दिले जातात. निवडणूक आयोगाच्या सदस्यांचा कालावधी ६ वर्षांचा असतो. वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत ते पदावरू राहू शकतात. त्या अगोदर ते राजीनामा देऊ शकतात किंवा पदावरून काढलेही जाऊ शकतात. या सर्व चर्चेवरून या पदाची प्रतिष्ठा व महत्ता स्पष्ट होते.

**निवडणूक आयोगाचे स्वरूप**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अन्वये निवडणूक आयोगास आपले कार्य बजावताना पुरेसे स्वातंत्र्य लाभावे म्हणून पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१. मुख्य निवडणूक आयुक्तास कालावधीची हमी देण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीप्रमाणे विशिष्ट पद्धतीविना त्यांना पदावरून दूर करता येणार नाही. त्यांचे गैरवर्तन किंवा अकार्यक्षमता याबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहांनी बहुमताने ठराव केल्याशिवय त्यांना पदावरून दूर करता येणार नाही. जरी त्यांची नियुक्ती राष्ट्रपतींनी केली असली तरी केवळ त्यांच्या मर्जीखातर ते पदावर राहू शकत नाहीत.
२. अधिकारपदाचे ग्रहण केल्यानंतर मुख्य निवडणूक आयुक्ताच्या सेवाशर्ती बदलल्या जाणार नाहीत.
३. कोणत्याही निवडणूक आयोग सदस्यास किंवा प्रादेशिक निवडणूक आयोग सदस्याला मुख्य निवडणूक आयुक्ताच्या शिफारसीशिवाय सेवेतून दूर करता येणार नाही.

निवडणूक आयुक्तास उपरोक्त विशेषाधिकार व स्वातंत्र्य असले तरी त्यामध्ये काही विसंगतीही आहेत. त्यांचा निर्देश खालीलप्रमाणे करता येईल.

१. राज्यघटनेने आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भात पात्रतेचे निकष (कायदेशिर, शैक्षणिक, प्रशासकीय अथवा न्यायालयीन) स्पष्ट केलेले नाहीत.
२. आयोगाच्या सदस्यांचा निश्चित कालावधी घटनेमध्ये नोंदविलेला नाही.
३. निवडणूक आयोग सदस्याला निवृत्तीनंतर केंद्र व राज्य सरकारची सेवा करण्याच्या बाबतीत संविधानामध्ये काहीही म्हटलेले नाही.

**निवडणूक आयोगाचे अधिकार**

संसद, राज्य विधानसभा तसेच राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकांसंदर्भात निवडणूक आयोगाची कार्ये पुढील तीन घटकांमध्ये मांडता येतील. तथापि आयोगाची निवडणुकासंदर्भात प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे नोंदविता येतील.

१. सबंध देशभरातील निवडणूक मतदारसंघ प्रदेशाचे क्षेत्र निश्चित करणे हा निर्णय डिलिमिटेशन कमिशन ॲक्ट १९६५ अन्वये घ्यावा लागतो. १९५२ चा हा कायदा १९६२, १९७२ व २००२ मध्ये दुरुस्त करण्यात आला.
२. निवडणूक मतदारांची यादी तयार करणे व विशिष्ट कालावधीनंतर या यादीची पुनर्रचना करणे.
३. निवडणुकांच्या तारखा व वेळापत्रक जाहीर करणे व उमेदवारी अर्जाची छाननी करणे.
४. राजकीय पक्षांना मान्यता देणे व त्यांना निवडणूक चिन्ह प्रदान करणे.
५. राजकीय पक्षांना मान्यता देण्यावरून व त्यांना चिन्ह प्रदान करण्यावरून उद्धवलेले मतभेद सोडविताना न्यायालय या नात्याने काम करणे.
६. निवडणूक व्यवस्थापनातून ते वाद उदभवतात ते सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे.
७. निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्ष व उमेदवारांनी पाळावयाच्या आचारसंहितेची निश्चिती करणे.
८. आकाशवाणी व दूरदर्शन राजकीय पक्षांना त्यांच्या ध्येयधोरणानुसार प्रसिद्धी करण्यासाठी वेळापत्रक तयार करणे.
९. संसद सदस्यांच्या अपात्रतेबाबत राष्ट्रपतींना वेळोवेळी सल्ला देणे.
१०. राज्यपालांना राज्य विधिमंडळ सदस्यांच्या अपात्रतेसंदर्भात सल्ला देणे.
११. मतदान केंद्रावर ताबा, मतपेट्या पळविणे, हिंसाचार व इतर अनियमिततेवरून निवडणूक रद्द ठरविणे.
१२. निवडणूका घेण्यासाठी लागणारा कर्मचारीवर्ग नेमण्यासाठी राष्ट्रपती वा राज्यपालांना विनंती करणे.
१३. मुक्त व खुल्या वातावरणामध्ये निवडणुका घेण्यासाठी देशभरातील यंत्रणेचे पर्यवेक्षण करणे.
१४. आणिबाणीचा कालावधी लोटून एक वर्ष झाल्यानंतर राष्ट्रपती राजवटीखाली असलेल्या प्रदेशामध्ये निवडणुका घेण्यासाठी राष्ट्रपतींशी चर्चा करणे.
१५. राजकीय पक्षांना निवडणुकीसाठी नोंदणी आणि त्यांच्या कामगिरीनुसार त्यांना राष्ट्रीय वा राज्यस्तरीय पक्ष या नात्याने मान्यता देणे.

ही सर्व कामे निवडणूक आयोगास सातत्याने करावी लागतात. त्यामुळे निकोप व निरोगी लोकशाहीची प्रक्रिया गतिमान राहाते.

**सारांश**

एकंदरीतच भारतीय लोकशाहीच्या निवडणुकांचा आधारस्तंभ हा भारतीय निवडणूक आयोग आहे. निवडणूक आयोगाची मतदान प्रक्रियेची संपूर्ण प्रक्रिया पाहता ही प्रक्रिया अत्यंत व्यापक स्वरूपाची असल्याचे दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने मतदार याद्या तयार करण्यापासून ते मतदान घेऊन मतदानाचा निकाल लावण्यापर्यंत तसेच निवडणुका शांततामय व निः पक्षपातीपणे पार पाडण्याची जबाबदारी ही निवडणूक आयोगाची आहे.

**संदर्भग्रंथ**

१. कश्यप सुभाष वी, आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, २००६,

२. घोडेस्वार देविदास, संपादक, मूळ इंग्रजी संस्करण लोकसभा सचिवालय, नवी दिल्ली, द्वारे प्रकाशित, संविधान सभा डिबेटस्, प्रथमावृत्ती २०१३, खंड एक,

३. Devics M. R. & Levis V. A., Model of Politcal System, Vikas, New Delhi, 1971

४. Basu Durgadad, Introduction of Constitution of India, Nagpur, 2007

५. Lipset SM Led, Public & Social, Whley Esatem PVt. Ltd. New Delhi, 1972